# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.१५ वाजेपर्यंत)

**अर्धा-तास चर्चा - म.वि.प. नियम ९२ अन्वये -**

**(मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करण्याबाबत" या विषयावरील श्री.दिपकराव साळुंखे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४०५१ ला दिनांक ११/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

"मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीनंतर शासनाने केलेल्या उपाययोजनेबाबत" या विषयावरील श्री.प्रविण पोटे पाटील, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४३३३ ला दिनांक १८/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक १३ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक ३ व ४)**

**(३) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यात लक्कडकोट गूडा येथे ७० वर्षापूर्वी सर्व्हे नं. ९२ मध्ये ३०० लोकवस्ती असलेले पारधी समाज वसलेले असून, त्यांना कुळकायद्यातून मारवाडी तुकाराम राजकोंडावर यांच्या १७ एकर जमिनीचा मालकीहक्क श्री. आबाजी देशमूख शेरेकर यांना बहाल होणे, व त्यावर गावातील कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असणे, परंतू सदर जमिन आदिवासींना कुळकायद्यात मिळाली असून तेथील श्री. राजकोंडावार यांचे नातू बाप- दादाची जमीन आहे म्हणून सदर जमिन विकण्याचा सौदा करुन ती जमिन ६० लाखात विकण्यात येणे, दिनांक २९ जुलै, २०११ रोजी राजूरा तहसिल कार्यालयातील उपनिबंधक कार्यालय येथे विक्रीपत्र करण्यात येणे, परंतू आदिवासी कुळकायद्यात मिळालेल्या जमिनीची विक्री होत नसतांना झालेला गैररित्या व्यवहार, त्यामुळे आदिवासीना हक्कापासून वंचित होण्याची

आलेली वेळ, शासनाने गैररित्या होणाऱ्या विक्री प्रकरणी कारवाई करण्याची आवश्यकता. "

(४) **श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शासनमान्य खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, माध्यमिक आश्रमशाळा अध्यापक विद्यालये, तंत्र माध्यमिक विद्यालयांना १९८१ ची महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली लागू असणे, नियम १६ अन्वये महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेची तरतूद असणे, १ वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास प्रसूती रजा बिनपगारी देय असणे, १ वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सेवेनंतर वेतनासह रजा देय असणे, १ वर्षाच्या सेवेनंतर प्रसूती रजा ही महिलांची हक्काची रजा असणे, शिक्षण सेवकांनाही प्रसूती रजेचे नियम नियमित महिला कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू असणे, १ वर्षापेक्षा अधिक सेवा असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक कालावधी प्रसूती रजेइतका शिक्षण सेवक कालावधी वाढविण्याचा निर्णय घेणे, महिला कर्मचाऱ्यांचा देय रजेचा कालावधी अर्हताकारी सेवा न धरणे महिला कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. "

**(गुरुवार, दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक ५ व ६)**

(५) **श्री. चंद्रकांत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पश्चिम घाटातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या वनक्षेत्रात परदेशी झाडांच्या लागवडीमुळे जैव विविधता धोक्यात आली असणे, या प्रकारच्या झाडांच्या संदर्भात अनेक तज्ञ किंवा अनुभवी शेतकरी यांच्याशी चर्चा केली असता हे वृक्ष स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेत असले तरीही त्यापासून पर्यावरणाची हानीच करीत असल्याचे मत असणे, या वृक्षावर सहसा पक्षी न बसणे, किंवा घरटेही न बांधणे वन्य प्राणी अशा झाडाखाली आश्रय घेत नसणे, या झाडाखाली गवत किंवा अन्य वनस्पती उगवत नसणे, ह्या वृक्षाचे आयुर्मान कमी असणे, त्यामुळे भविष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलात गत सहा महिन्यांपासून अवैद्यरित्या सागवानासह अन्य वृक्षांची तोड होणे, वन अधिकारी जंगलतोडीकडे दुर्लक्ष करीत

असणे, त्यामुळे वन संपदा कमी होऊन नष्ट होण्याची शक्यता निर्माण होणे, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक १८ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक ७ व ८)**

**(७) डॉ. नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे शहरात गेल्या वर्षभरात १८६० स्त्रिया तर ७३६ मुली बेपत्ता होण्याच्या घटना घडणे, या बेपत्ता झालेल्या व अपहरण केलेल्या बालकांना अत्यंत वाईट पध्दतीने वागविण्यात येत असून त्यापैकी काही मुलांकडून गैरकृत्ये करवून घेणे, काही मुलांना ठार मारुन त्यांच्या अवयवांचा व्यापार करणे, काही बालकांना दुसऱ्या राज्यात विकणे, अशाप्रकारे बेपत्ता व अपहरण बालकांचे हाल होत असणे, शासनातर्फे बालकल्याणचे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत असणे, बेपत्ता होणाऱ्या स्त्रिया, मुले व मुली यांचा तपास त्वरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"जिल्हा महसूल विभाग हा शासनाचा कणा असूनही राज्यात ४ अप्पर जिल्हाधिकारी, ७१ उपजिल्हाधिकारी, ८१ तहसिलदार, आणि ४३१ नायब तहसिलदार अशी महसूल खात्यातील तब्बल ५८७ पदे रिक्त असणे, सदरची पदे भरण्याकरिता एमपीएससी पासून ते अनेक मार्ग अवलंबून असले तरी याकडे शासनाचे लक्ष नसणे, सरळसेवेची भरती एमपीएससी मार्फत होत मात्र त्यांच्याकडे केवळ महसूलच नाही तर अनेक विभागाच्या मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या विभागात जी पदे रिक्त आहेत त्यात रोहयो, भूसंपादन, करमणूक कर, जिल्हा पुरवठा अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन अशा महत्वाच्या विभागाचा समावेश असणे, आधीच कर्मचारी-अधिकारी काम करीत नसणे त्यातच या रिक्त पदांमुळे मात्र जनतेची अवस्था बिकट होणे, अनेक विकासाची कामे मंदगतीने सुरु असणे तर काही कामे ठप्प होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या रिक्त जागा तातडीने भरण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही."

**(मंगळवार, दिनांक १९ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक ९ व १०)**

(९) **श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.**

"नाशिक जिल्ह्यातील देवस्थानाच्या नावे असलेल्या जमिनींना अकृषिक परवानगी देताना अथवा विक्रीस शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याबाबत" या विषयावरील श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३५०१७ ला दिनांक १४/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(१०) **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

" बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत " या विषयावरील श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४१६२ ला दिनांक २१/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना ) (क्रमांक ११ व १२)**

(११) **श्री.सतिश चव्हाण व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात दिवसेंदिवस महागाई वाढत असूनही सेवायोजन कार्यालयात नोंदणी करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे, नोकरीची संधी प्राप्त होत नसल्याने गोवा शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना रुपये १२००/- प्रतिमहिना देण्याचा निर्णय घेतला जाणे, तथापि प्रगत अशा महाराष्ट्र शासनाने गोवा शासनाच्या निर्णयाप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांना मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मौजे मुरली तांडा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील मारुती मंदिराजवळ गुप्त धनासाठी बालिकेचा बळी देण्यासाठी खड्डा खोदण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये निदर्शनास येणे, अद्याप खेडोपाड्यात अंधश्रध्दा असून बालकांचा बळी देण्यात येत असणे, सदर घटनेत समाविष्ट असलेल्या संशयीतांना पकडून पोलीसांच्या स्वाधीन करण्यात येवूनही त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात न येणे, परिणामी नागरीकांत पसरलेले भितीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सकाळी ११.३० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**महिला व बालविकास मंत्री** : "विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात पंतप्रधान पॅकेजअंतर्गत सामुहिक विवाहासाठी जाहीर केलेल्या खर्चाच्या आकडेवारीत विसंगती असल्याबाबत" या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व श्री. जगदीश गुप्ता, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ४२२७३ ला दिनांक २२ जुलै, २००८ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने - (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. प्रकाश बिनसाळे,** श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरंजन डावखरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील**:-**

" मुंबईमध्ये तब्बल ५४०० मोबाईल टॉवर असून त्यापैकी ३३७० टॉवरना पालिकेची परवानगी असणे, या टॉवरमधून होणाऱ्या किरणोत्सर्गामुळे मानवी आरोग्यास तसेच पशुपक्षांवर विपरित परिणाम होणे, यासाठी पालिकेने काही धोरणे आखलेली असणे, तथापि सदर धोरणाची अंमलबजावणी मोबाईल टॉवर कंपन्यांकडून न करता मोठ्या प्रमाणात मानवी आरोग्यावर तसेच पशुपक्ष्यांवर विपरित परिणाम होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने केलेली व करण्यांत येत असलेली कार्यवाही व उपाययोजना. "

(२) **ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यात होणारी पोलीस भरती ही 'सरळसेवा भरती प्रक्रिया' व 'पोलीस खात्यात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती' अशा दोन प्रकारे करण्यात येत असतांना सन २००३ नंतर सरळसेवा भरती प्रक्रिया झाली, परंतु आतापर्यंत पोलीस खात्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती प्रक्रिया करण्यात न येणे, यामुळे राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, ज्याप्रमाणे सरळसेवा भरती प्रक्रिया करण्यात येते, त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता करण्यात येणारी भरती शासनाने पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. चंद्रकांत पाटील,** नरेंद्र पाटील, विनोद तावडे, विनायकराव मेटे, भगवान साळुंखे, दिपकराव साळुंखे, हेमंत टकले, संदिप बाजोरिया, अनिल भोसले, प्रकाश बिनसाळे, जयवंतराव जाधव, विक्रम काळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील मराठा समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याचा गेल्या ३ वर्षांपासून प्रलंबित असलेला निर्णय, मराठा समाजातील मुलांना चांगले गुण मिळूनही इंजिनियरिंग, मेडिकल, आयआयटीसारख्या क्षेत्रात उच्च शिक्षणाची दारे बंद होणे, सद्य:स्थितीत एकूण ५२ टक्के आरक्षण अनुसूचित जाती-जमाती, भटक्या, इतर मागास, विशेष मागास आदी जातींना दिले असणे, मराठा समाजातील युवकांत बेकारीचे प्रमाणात वाढ होणे, राजर्षी शाहू महाराजांचा जाहीरनामा, ब्रिटीश शासन निर्णय, १९५५ सालचा कालेकर आयोग यांनी मराठा जातीचा समावेश ओबीसीमध्ये केला असणे, मात्र सद्य:स्थितीत राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल शासनास सादर करुनही शासनाकडून वेगवेगळया समित्यांची नियुक्ती करुन निर्णयाबाबत चालढकल करण्यात येणे, तृतीय अधिवेशन २०१२ दरम्यान उद्योग मंत्री यांची एकसदस्यीय समिती नियुक्त करुन एका महिन्यात मराठा समाजास आरक्षण देण्याची केलेली घोषणा, सदर आश्वासनाचे पालन न झाल्यामुळे राज्यातील मराठा समाजात पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. विनायकराव मेटे,** राजेंद्र जैन, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. किरण पावसकर**,** सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड येथील (जि.बीड) आदित्य पॉलिटेक्नीक व मिठ्ठलालजी सारडा पॉलिटेक्नीक महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ८०० असणे, यात मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दाखविण्यात येणे, या विद्यार्थ्यांना केंद्र शासनामार्फत शिष्यवृत्ती मिळत असणे, परंतु या दोन्ही महाविद्यालयात बनावट मागासवर्गीय दाखवून त्यांच्या नावावर केंद्र शासनाकडून मिळालेल्या करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असणे, वास्तविक पाहता ८० ते ९० टक्के विद्यार्थी परिक्षेला बसणे आवश्यक असताना फक्त १६ ते १७ टक्के विद्यार्थीच परिक्षेला बसणे, या दोन्ही महाविद्यालयांविरुध्द बऱ्याच तक्रारी असणे, मागासवर्गीय अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत भ्रष्टाचार करणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. वसंतराव खोटरे,** विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"सन १९९१ ते १९९९ या कालखंडातील नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिलेल्या लेखी अभिवचनाचे पालन न होणे, दिनांक १ जानेवारी २००६ रोजी पासून पुढच्या ४ वर्षासाठी येणाऱ्या थकबाकीचा ८०% अंशभाग देण्यासाठी केंद्र शासनाचा शासन निर्णय निर्गमित होणे, मात्र महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत याबाबतीत कार्यवाही न करणे, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ५ व ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा होऊनही मागण्या मान्य न होणे, संघटनेने विद्यापीठीय परिक्षांवर व उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकणे, विद्यापीठ आयोग व मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, इत्यादी मागण्यांसाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी मुंबई येथे जेलभरो आंदोलन करण्याबाबतचे एक निवेदन दिनांक १६ डिसेंबर, २०१२ रोजी किंवा त्या दरम्यान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना देणे, दिनांक ८ मार्च, २०१३ रोजी आझाद मैदान येथे १०,००० प्राध्यापकांना अटक होणे, विद्यार्थी पालकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण होणे, शासनाकडून अद्यापपर्यंत मागण्या मंजुर न होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**सहा : अशासकीय विधेयके -**

**विचारार्थ -**

**१)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०११ - श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे.

**२)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११ - श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**३)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११ - श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे.

**४)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११ - श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - **(चर्चा पुढे सुरु)**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.